**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380,*
http://www.srjis.com/issues_data?issueId=218
***Peer Reviewed, Refereed & Indexed Journal, JULY-AUG, 2023, Vol- 12/78***
https://doi.org/10.5281/zenodo.8333615

# हॅलो या स्वयंसेवी संस्थेच्या बचत गटांचे महिला सक्षमीकरणातील योगदान: एक समाजशास्त्रीय अध्ययन

प्रा . शिवाजी उकरंडे

सहाय्यक प्राध्यापक,समाजशास्त्र विभाग, गोगटे जोगळेकर महाविद्यालय ,रत्नागिरी.

shivaji282@gmail.com

**Paper Received On**: 21 AUG 2023

**Peer Reviewed On**: 27 AUG 2023

**Published On:** 01 SEPT 2023

***Abstract***

नवउदारवादी धोरणाच्या स्विकाराने संरचनात्मक समायोजन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीने, सार्वजनिक खर्चात कपात झाल्याने, जागतिकीकरणाच्या पर्वात राज्याच्या कल्याणकारी भूमिकेचा संकोच होत आहे. त्याची जागा या काळात नागरी समाजाच्या संस्था घेताना दिसत आहेत. नागरी समाजाची भूमिका ही समाजशास्त्रातील नवे वादक्षेत्र म्हणून पुढे आले आहे. स्वयंसेवी संस्था या नागरी समाजाचाच भाग आहेत. समाजातील प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी निस्वार्थ,सेवाभावी वृत्तीने प्रेरित असा जाणीव जागृत लोकांचा समूह, निच्छित उद्दिष्ट्ये निर्धारित करून कधी शासकीय विकास योजनांना साह्य करीत तर कधी शासकीय धोरणांची चिकित्सा करीत संघटितपणे अशासकीय संघटनांच्या रूपाने पुढे येत आहे. एकीकडे या संघटना भांडवलशाहीच्या हस्तक(कारत प्रकाश:१९८४) आहेत, त्यांनी सामाजिक चळवळींची धार कमी बोथट केली अशी टीका त्यांच्यावर होत आहे तर दुसरीकडे शांततामय क्रांतीच्या अग्रदूत(शर्मा:१९९२) असे वर्णन समर्थक करताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरी समाज आणि त्यांच्या अशासकीय संघटना हा समाजशास्त्रीय अध्ययनाचा विषय बनला आहे.

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

१९७० च्या दशकात समाजशास्त्रातील मुख्य प्रवाही आशय, विषय, ज्ञानधारणा यांची चिकित्सा झाली. समाजातील वंचित समुहांचे प्रश्न हेतुतः दुर्लक्षिले गेले अशी टीका झाली आणि पर्याय म्हणून वंचितांचे समाजशास्त्र पुढे आले. वंचितांच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेऊन कार्य करणाऱ्या या अशासकीय संघटना संस्था समाजशास्त्रीय अध्ययन, संशोधनाच्या ऐरणीवर आल्या.या पार्श्वभूमीवर हॅलो या स्वयंसेवी संस्थेच्या बचत गटामुळे महिलांचे झालेले सक्षमीकरण यांचे अध्ययन करून त्याविषयीचे निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केला आहे.

प्रमुख संकल्पना, संज्ञा: स्वयंसेवी संघटना, महिला सक्षमीकरण.

**प्रस्तावना:**

समाजाच्या उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या गरजामधुन सामाजिक संघटनांचा उदय झाला. त्यांचा समग्र समाजव्यवस्थेवर साधक-बाधक परिणाम होऊ लागला, त्यातुनच सामाजिक संघटना समाजशास्त्रीय चिंतनाचा विषय बनला आणि संघटनांचे समाजशास्त्र (Sociology of Organization)निर्माण झाले.

एनजीओ (NGO)अर्थात अशासकीय संघटना या सामाजिक संघटनाचा एक भाग आहेत. जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर विशिष्ट आर्थिक राजकीय वातावरणात या अशासकीय संघटनाचा उदय झाला. स्वयंसेवी संघटना म्हणजे काही सामान्य हितसंबंधावर आधारित राज्याचा नियंत्रणाशिवाय ऐच्छिक सदस्यत्व असलेल्या लोकांचा संघटित समूह होय. (मुतालिब :१९८७) स्वयंसेवी संस्था समूहाला तत्कालीन विकासाची दृढ इच्छा व प्रेरणा घेऊन तिच्या सदस्यांचा आर्थिक उत्कर्ष व्हावा यासाठी समर्पित भावनेने प्रेरित झालेल्या नेतृत्वासमवेत उपलब्ध संसाधनाच्या आधारे कार्य करीत असतात(ईनामदार:१९८८) ज्या संस्था संघटना कायदेशीर पंजीकृत झालेल्या असतात ,ज्यांना लेखी घटना असते,त्यांच्या कामकाजाचे नियम निश्चित झालेले असतात, पदाधिकाऱ्यांची निवड प्रक्रिया ठरलेली असते आणि ज्यांना विकासात्मक कार्य निधी देण्यास पात्र मानले जाते म्हणजेच शासन,आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था ज्यांना मान्यता देते अशा संस्था संघटनाचा अंतर्भाव

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

एनजीओ मध्ये होतो (धनागरे : २००५). स्वयंसेवी सेवाभावी कार्य सामुहिकपणे करणाऱ्या या संस्थांना एनजीओ हे नाव मात्र 1945 साली युनोच्या स्थापनेनंतर वापरले जाऊ लागले. (दिनानाथ मनोहर : २०११).

दलित, आदिवासी ,कामगार,अपंग,महिला व बालकामगार अशा सिमांतीक समूहाचे प्रश्न घेऊन ,त्यांच्या सुधारणा सक्षमीकरणासाठी स्वयंसेवी संस्था काम करताना दिसतात, जागतिकीकरणाच्या पर्वात शासनाच्या कल्याणकारी धोरणाच्या कपातीकरणाने एनजीओ च्या विस्तारीकरणाला अवकाश मिळालेला दिसतो.

वरील विषयाच्या अनुषंगाने **हॅलो** या स्वयंसेवी संस्थेच्या बचत गटांचे महिला सक्षमीकरणातील योगदान : एक समाजशास्त्रीय अभ्यास" असा अध्ययन विषय निर्धारित केला. महिला सक्षमीकरणाच्या निर्देशकाच्या आधारे 'हॅलो' या स्वयंसेवी संस्थेच्या बचत गटांचे महिला सक्षमीकरणातील योगदानाचे अध्ययन करण्यात आले. त्याविषयीच्या तथ्यांची व त्यावर आधारीत निष्कर्षाची मांडणी प्रस्तुत शोध निबंधात केली आहे

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

1. हॅलो या स्वयंसेवी संस्थेची उद्दिष्ट्ये धोरणे व कार्यक्रम यांचा अभ्यास करणे.
2. हॅलो या स्वयंसेवी संस्थेच्या बचत गटांनी महिला सक्षमीकरणात केलेल्या योगदानाचे अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती :**

तुळजापूर तालुक्यातील 'हॅलो' या स्वयंसेवी संस्थेच्या कार्यक्षेत्रातील १० गावे प्रस्तुत अध्यायनाचे विश्व आहे. प्रत्येक गावातील हॅलोच्या बचत गटांपैकी प्रत्येक बचत गटातील ०१ याप्रमाणे सहेतुक नमूना निवड पद्धतीने १०गावांमधून ५० उत्तरदात्यांची संख्या निर्धारित करण्यात आली. हॅलोच्या महिला सक्षमीकरण कार्यक्रमात सहभागी होऊन लाभ मिळालेल्या महिला निरक्षर असल्याने प्राथमिक तथ्य संकलन करण्यासाठी मुलाखत- अनुसूची या तंत्राचा उपयोग करण्यात

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

आला. तसेच प्रकाशित अहवाल, लेख , संदर्भग्रंथ या दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला. प्रस्तुत संशोधनासाठी अन्वेषनात्मक संशोधन आराखड्याची निवड केली आहे.

**सक्षमीकरण-संकल्पना:**

सक्षमीकरण ही संकल्पना पाउलो फ्रेअरे यांनी मांडली.शिक्षणासंबंधीच्या चर्चेमध्ये लॅटिन अमेरिकेत ही संकल्पना त्यांनी प्रथम मांडली.गरिबांमध्ये जाणीव-जागृती घडवून आणली तर ते चिकित्सकपणे विचार करायला लागतात आणि शोषणकारी,अन्याय सत्ता-संरचनेला आव्हान देवून त्याविरुद्ध कृती करायला तयार होतात.यातून ते स्वत:चे जीवन बदलू शकतात.स्वत:चे जीवन स्वत:च्या हातात घेऊ शकतात.साक्षरतेतून त्यांना लिखित ज्ञान उपलब्ध होईल.ज्ञान ही देखील सत्ता आहे.हे शिक्षण त्यांना सक्षम बनवेल,अशी सक्षमीकरणाची संकल्पना फ्रेअरे यांनी मांडली.(कोतवाल लेले :२००७)

**महिला सक्षमीकरण**

महिला नावाचा भारतीय समाजातील जो घटक आहे त्याला आपल्या जीवनात सर्व क्षेत्रात आपल्या सुप्त क्षमता प्रत्यक्ष वापरता येतील असा समज निर्माण करणे म्हणजे सक्षमीकरण होय (भागवत : २००१) १९८५ मध्ये नैरोबी येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेपासून महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून जाहीर केले. अभ्यासक, संशोधक,धोरणकर्ते स्वयंसेवी संस्था यांच्याकडून महिला सक्षमीकरणाचे निर्देशक निर्धारित करण्याचे प्रयत्न झाले. महिला सक्षमीकरणातील स्वयंसेवी संस्थांची भूमिका हा विषय अध्ययनाच्या केंद्रस्थानी आला.

**‘हॅलो’ या स्वयंसेवी संस्थेच्या उदयाची पार्श्वभूमी व विस्तार :**

१९८० साली मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे या मागणीने आंदोलनाला सुरवात झाली. एकीकडे विद्यार्थ्यांमध्ये जातीय दरी दुसरीकडे वैद्यकीय क्षेत्र व समाज यातील दरी वाढत असल्याचे डॉ. शशिकांत अहंकारी यांनी जाणवले. डॉक्टरांची समाजातील देवांची प्रतिमा जाऊन धंदेवाईक,नफेखोर, समाजाला नागवणारा डॉक्टर अशी प्रतिमा तयार होत होती. आपल्या ज्ञानाचा

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

उपयोग समाजातील आरोग्यविषयक दारुण अवस्था संपविण्यासाठी करणे गरजेचे आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी अवस्थांचे संघटन झाले आणि 'हॅलो' ही चळवळ सुरू झाली.

HALO अर्थात (Health and Auto Learning Organization) ही चळवळ वैद्यकीय महाविद्यालय औरंगाबाद मध्ये सुरू झाली १९९२ साली या चळवळीतील जुन्या १५ ते २०0 जणांनी एकत्र येऊन 'हॅलो मेडिकल फाऊंडेशन'ही संस्था स्थापन केली. एप्रिल १९८३ मध्ये डॉ. शशिकांत अहंकारी व डॉ. शुभांगी अहंकारी यांनी जानकी रुग्णालय सुरू केले.

**हॅलो या स्वयंसेवी संस्थेचे महिला सक्षमीकरण विषयक कार्यक्रम :**

**भारत वैद्य कार्यकर्ती (१९९४) :**

30 सप्टेंबर १९९३ च्या किल्लारी परिसरातील भीषण भूकंपाने लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यातील १०,००० लोक मृत्यू पावले, तेवढेच जखमी झाले, अशावेळी प्रत्येक गावात कायमस्वरूपी आरोग्य कार्यकर्ती तयार करण्यासाठी भारत वैद्य प्रशिक्षण केंद्राची 'हॅलो' ने १९९५ मध्ये सुरुवात केली. ५० दिवसात अभ्यासक्रम तयार करून ३ आठवडे सलग निवासी प्रशिक्षण देण्यात आले. या भारत वैद्य महिला साध्या व मध्यम आजारांचे निदान करून त्यावर उपचार करतात. या उपचारपोटी औषधाचे पैसे त्या घेतात. गंभीर आजाऱ्याला त्या मोठ्या दवाखान्यात पाठवून देतात. **एसटी च्या खर्चात उपचार गावात** हे या कार्यक्रमाचे घोष वाक्य. माता, बालसंगोपन,गरोदर महिलांची काळजी, लसीकरणात मदत,अनेक रोग प्रतिबंधक कार्यक्रमात सहभाग, परिसर स्वच्छता ,राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभाग त्या घेतात.

**संजीवनी महिला बचत संघ (१९९६) :**

१९९० च्या दशकात महमद युनूस यांच्या यशस्वी प्रयोगाने बचत गटांची कल्पना विकसनशील देशात वेगाने विस्तारली. सरकारी व स्वयंसेवी स्तरावर या कामाला वेग आला. महिलांच्या आरोग्याशी निगडीत सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने बचतगट एक महत्वाचे माध्यम आहे हे ओळखून हॅलो ने आपल्या २५ बचतगटांना एकत्र करून संजीवनी महिला बचत संघ निर्माण केला.

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

बचतगटातील महिलांनी वेगवेगळे व्यवसाय, शेती , मुलांच्या शिक्षणासाठी त्याचा उपयोग करून घेतला.

**स्वयंसिद्धा प्रकल्प (२०००) :**

सामाजिक,आर्थिकदृष्ट्या वंचित असणाऱ्या महिलांचे आरोग्य व जीवनमान वाढविणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट. महिलांच्या आरोग्याचा प्रश्न हा फक्त तिचा नसून स्त्री व पुरुष या दोघांचाही असल्याने यापैकी एकावर लक्ष केन्द्रित करून काम करण्याची संस्थेची भूमिकाच नसल्याने स्त्री व पुरुष दोघांच्या सहभागातून विशेष प्रयत्न करून सोडविण्यासाठी संस्थेत सन २०००मध्ये या प्रकल्पाच्या कामाचा शुभारंभ केला. आरोग्यविषयक शिक्षणाबरोबरच समाजातील वेगवेगळ्या विषयासंदर्भात चिकित्सा करण्याची, आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न या प्रकल्पातून झाला.भारत वैद्य कार्यकर्ती व त्याचे पती यांचे एकत्रित प्रशिक्षण घेऊन त्यांच्यात लिंगभाव समानतेची जाणीव निर्माण केली.

**किशोरीगट प्रशिक्षण :**

संस्थेने १३ ते १८ वयोगटाच्या शाळेतील मुलामुलींसाठी निबंध स्पर्धेसाठी लिंगभाव समानता अभिमुख विषय दिले जातात. मिनाकार्टून दाखवून वयात येताना होणाऱ्या बदला विषयी जाणीव जागृती केली जाते.

**कायदे विषयक प्रशिक्षण :**

महिला आणि हिंसाचार या विषयी जाणीव निर्माण करून त्या विरोधी व्यूहरचना तयार करण्यासाठी बचतगटातील महिलांना कायदेविषयक प्रशिक्षण देऊन हिंसा म्हणजे काय? कौटुंबिक हिंसा कशास म्हणतात ? ते समजावून सांगण्यात येते. गावातील महिला विरोधी हिंसाचारासंदर्भात महिला बोलू लागतात.

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**सावली केंद्र (२००२) :**

हिंसाचाराने पीडित महिलेच्या आधारासाठी सल्ला, समोपचार समूपदेशनासाठी हॅलो ने सावली केंद्राची स्थापना केली. महिला अत्याचाराविरोधी मोर्चा , दारुबंदी, व्यसनमुक्ती असे उपक्रम या केंद्राने राबविले. नववधुचे स्वागत व सासूंचा सत्कार असा अभिनव उपक्रम घेऊन लिंगभाव समानता विषयक चर्चा केली जाते.

**संजीवनी आरोग्यविमा योजना (२००४):**

महिलांच्या आरोग्याकडे पैशाअभावी दुर्लक्ष केले जाते हे लक्षात आल्याने बचत गटातील महिलांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी अर्थसाह्य मिळावे या मागणीतून आरोग्य विमायोजना सुरू केली.

**सारणी क्रं १**

**उत्तरदात्यांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती**

| **अ.क्र** | **सामाजिक-आर्थिक स्थिती निर्देशक** | **एकूण *N=50*** | | **वारंवारिता** | **प्रमाण** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **वयोगट** | **५०** | २० ते ४० | २२ | ४४% |
| | | | ४१ ते ६० | २५ | ५०% |
| | | | ६१ आणि त्यापेक्षा जास्त | ०३ | ६% |
| **2** | **वैवाहिक दर्जा** | **५०** | विवाहित | ४३ | ८६% |
| | | | विधवा | ०६ | १२% |
| | | | परित्यक्त्या | ०१ | ०२% |
| **३** | **शैक्षणिक दर्जा** | **५०** | निरक्षर | १९ | ३८% |
| | | | प्राथमिक | १५ | ३०% |
| | | | माध्यमिक | १४ | २८% |
| | | | उच्च माध्यमिक | ०१ | ०२% |
| | | | प्रौढ साक्षर | ०१ | ०२% |

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | सामाजिक प्रवर्ग | ५० | खुला | ३३ | ६६% |
| | | | अनुसूचित जाती | ०७ | १४% |
| | | | इतर मागास प्रवर्ग | ०५ | १०% |
| | | | भटक्या विमुक्त जमाती | ०५ | १०% |
| ५ | कुटुंब प्रकार | ५० | संयुक्त | १८ | ३६% |
| | | | विभक्त | ३२ | ६४% |
| ६ | कुटुंब प्रमुख | ५० | पती | ३२ | ६४% |
| | | | सासरे | ०१ | ०२% |
| | | | मुलगा | ०३ | ०६% |
| | | | स्वत: | १४ | २८% |
| ७ | घराची मालकी | ५० | स्वत:चे घर | ४९ | ९८% |
| | | | इतर (परित्यक्त्या आई-वडिलासोबत ) | ०१ | ०२% |
| ८ | कुटुंबाचा मुळ व्यवसाय | ५० | शेती | २५ | ५०% |
| | | | नोकरी | ०१ | ०२% |
| | | | व्यापार | ०५ | १०% |
| | | | शेतमजुरी | १५ | ३०% |
| | | | मुळव्यवसाय नाही | ०४ | ८% |
| ९ | कुटुंबाचे उत्पन्न | ५० | २५००० पर्यंत | ०८ | १६% |
| | | | २५००१ ते ५०००० | १९ | ३८% |
| | | | ५०००१ ते ७५००० | ०७ | १४% |
| | | | ७५००१ ते १००००० | ०६ | १२% |
| | | | १००००० पेक्षा जास्त | १० | २०% |

**सारणी क्रं २ :बचत गटाच्या मदतीने सुरू केलेले व्यवसाय**

| अ . क्र | बचत गटाच्या मदतीने सुरू केलेले व्यवसाय | वारंवारिता | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शेती-पूरक व्यवसाय-पशुपालन(१०),दुग्धपालन(१२) | 22 | ४६.८३% |
| | लघूउद्योग | ११ | २३.४०% |
| | व्यापार(किराणा दुकान,कापड दुकान) | ०५ | १०.६३% |
| | शेती विकासाठी(पाईपलाईन,बी-बियाणे,खते) | ०५ | १०.६३% |
| | शिवणकाम | ०४ | ८.५१% |
| | | ४७ | १००% |

**सारणी क्रं ३**

**व्यवसायाचे उत्तरदात्यांना मिळालेले लाभ**

| अ . क्र | व्यवसायाचे लाभ | वारंवारिता | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाली | ०८ | १७.०२% |
| २ | बचतीमध्ये भर पडली | ०७ | १४.८९% |
| ३ | संकटकाळी पैसे उपलब्ध झाले | ०८ | १७.०२% |
| ४ | व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध झाले | ०६ | १२.७७% |
| ५ | सावकाराकडून पैसे घेणे बंद झाले | ०५ | १०.६४% |
| ६ | आर्थिक स्वावलंबनात वाढ झाली | ०५ | १०.६४% |
| ७ | मुलाच्या शिक्षणासाठी मदत झाली | ०५ | १०.६४% |
| ८ | मुलांच्या विवाहासाठी मदत झाली | ०३ | ०६.३८% |
| | एकूण | ४७ | १००% |

**सारणी क्रं ४:**

**कुटुंबियाकडून उत्तरदात्यांना मिळणाऱ्या वागणुकीत झालेला बदल**

| अ.क्र | कुटुंबातील वागणूक | वारंवारिता | प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत स्थान मिळाले | ०५ | १०.६४% |
| २ | आर्थिक व्यवहारात विनियोग अधिकार मिळाले | ०४ | ०८.५१% |

Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | सन्मानाची वागणूक मिळाली | ०२ | ०४.२६% |
| ४ | वरील सर्व | ३५ | ७४.४७% |
| ५ | व्यवसायामुळे कुटुंबातील वागणुकीत बदल झाला नाही | ०१ | २.१२% |
| | एकुण | ४७ | १००% |

**सारणी क्रं ५**

**उत्तरदात्यांचा महिला सक्षमीकरण निर्देशांक**

| **अ .क्र** | **सक्षमीकरण निर्देशांक** | **एकुण** | | **वारंवारिता** | **प्रमाण** |
|---|---|---|---|---|---|
| १ | कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत मिळालेले स्थान | ४० | विवाह जुळवितांना | ०६ | १५% |
| | | | मुलांच्या शिक्षणबाबत | १० | २५ % |
| | | | मुलांच्या आरोग्याबब्त | १४ | ३५ % |
| | | | शेतीविषयक निर्णय घेताना | १० | २५ % |
| २ | कायदेविषयक प्रशिक्षणात सहभाग | ५० | सहभाग घेतला | ३३ | ६६% |
| ३ | महिला अत्याचार विरोधी मोर्च्यात सहभाग | ५० | सहभाग घेतला | १४ | २८% |
| ४ | गावातील दारू बंदीच्या लढ्यात सहभाग | ५० | सहभाग घेतला | १० | २०% |
| ५ | मतदान हक्क जागरूकता | ५० | आहे | ५० | १००% |
| ६ | स्वेच्छेने मतदान हक्क बजावणे | ५० | होय | ४९ | ९८% |
| | | | हॅलोच्या सांगण्यावरून | ०१ | ०२% |
| ७ | ग्राम सभेतील | ५० | सहभाग घेतात | १९ | ३८% |

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सहभाग | | सहभाग घेत नाहीत | ३१ | ६२% |
| ८ | ग्राम सभेतील सहभागाचे कारण | १९ | हॅलोच्या मार्गदर्शनाखाली | १८ | ९४.७४% |
| | | | मैत्रिणीच्या सांगण्यावरून | ०१ | ५.२६% |
| ९ | ग्राम सभेतील सक्रिय सहभागाचे स्वरूप | १९ | परिसर स्वच्छता विषयक प्रश्न | १३ | ६८.४२% |
| | | | पाणी,वीज पूरवठा विषयक प्रश्न | ०२ | १०.५३% |
| | | | शालेय पोषण आहार विषयक प्रश्न | ०१ | ५.२६% |
| | | | उपस्थित राहिले परंतु प्रश्न विचारले नाहीत | ०३ | १५.७९% |
| १० | निवडणुकीत उभे राहणे | ५० | होय | ०६ | १२% |

**तथ्यांचे विश्लेषण**

1) एकूण ५० (१००%) उत्तरदात्यांपैकी ४७ (९४%) उत्तरदात्यांनी बचत गटाच्या माध्यमातून व्यवसाय सुरू केल्याचे सांगितले त्यामध्ये शेतीपूरक म्हणजे पशुपालन व दुग्धव्यवसाय करणारांचे प्रमाण एकूण २२(४६.८१%) आहे. तर लघूउद्योग (पिठगिरणी ,मिरची कांडप,बांगडी व्यवसाय, कुंभार,सुतार व्यवसाय) करणारांचे प्रमाण ११ (२३.४०%) आहे. प्रत्येकी ०५(१०.६४%) उत्तरदात्यांनी अनुक्रमे व्यापार आणि शेती विकासासाठी बचत गटांकडून कर्ज घेतले आणि ४(८.५%) उत्तरदात्यांनी शिवणकाम व्यवसायासाठी बचत गटाची मदत घेतली.
2) व्यवसायाच्या लाभाविषयी पाहिले असता, कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाली आणि संकटकाळी पैसे उपलब्ध झाले अशी प्रतिक्रिया प्रत्येकी ०८ याप्रमाणे एकूण १६ (३४.०४%)

Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

उत्तरदात्यांनी दिली तर बचतीत भर पडली अशी प्रतिक्रिया ०७(१४.८९%) उत्तरदात्यांनी दिली. व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध झाले असे ०६ (१२.७७%) उत्तरदात्यांनी सांगितले. सावकारांकडून कर्ज घेणे बंद झाले, आर्थिक स्वावलंबनात वाढ झाली आणि मुलांच्या शिक्षणासाठी मदत झाली असे प्रत्येकी ०५ अशा एकूण १५(३१.९२%) उत्तरदात्यांनी सांगितले तर ०३(६.३८%) उत्तरदात्यांना त्यांच्या मुलांच्या विवाहासाठी मदत झाली.

3) बचत गटातील सहभागाचा प्रभाव कुटुंबामध्ये उत्तरदात्यांना मिळणाऱ्या वागणुकीत पडल्याचे दिसून आले. केवळ कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत स्थान मिळणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ०५(१०.६४%) इतके आहे तर केवळ आर्थिक व्यवहारात विनियोग अधिकार मिळाले अशी प्रतिक्रिया नोंदविणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ०४ (८.५१%) इतके आहे आणि केवळ सन्मानाची वागणूक मिळाली अशी प्रतिक्रिया नोंदविणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ०२ (४.१६%) इतके आहे. मागील तिन्ही घटकाविषयी कुटुंबातील वागणुकीतील सकारात्मक बदल झाल्याची प्रतिक्रिया ३५ (७४.४७%) उत्तरदात्यांनी नोंदविली तर बचत गटातील लाभामुळे उत्तरदात्यांच्या कुटुंबातील उत्तर दात्यांना मिळणाऱ्या वागणुकीत कोणताच बदल झाला नाही अशी प्रतिक्रिया एका उत्तरदात्याने नोंदविली आहे त्याचे प्रमाण २.१२% इतके आहे.

4) कुटुंबियांकडून उत्तरदात्यांना मिळणाऱ्या वागणुकीतील बदलाचे तपशील पाहता ४०(८५.११%) उत्तरदात्यांनी कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत स्थान मिळाले अशी प्रतिक्रिया नोंदविली तर ३९ (८२.९८%) उत्तरदात्यांच्या कुटुंबातील आर्थिक व्यवहारात विनियोग अधिकार मिळाले.३७ (७८.७३%) उत्तरदात्यांना कुटुंबात सन्मानाची वागणूक मिळाली.

5) ज्या ४० उत्तरदात्यांना कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत स्थान मिळाले त्याचे स्वरूप पाहिले तर मुलांच्या आरोग्याबाबत १४(३५%) उत्तरदात्यांना निर्णय घेता आला. मुलांच्या शिक्षणाबाबत निर्णय घेताना १०(२५%) उत्तर दात्यांना निर्णय प्रक्रियेत स्थान मिळाल्याचे दिसून येते. शेतीविषयक

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

निर्णय घेताना १० (२५%) उत्तरदात्यांना निर्णय प्रक्रियेत स्थान मिळाले. तर विवाह जुळवितांना ०६(१५%) उत्तरदात्यांना निर्णय प्रक्रियेत विचारात घेतलेले दिसून येते.

6) हॅलोच्या बचत गटामुळे उत्तरदात्यांना कुटुंबात मिळणाऱ्या वागणुकीत झालेल्या बदलाबरोबरच संशोधकांनी महिला सक्षमीकरणाच्या इतर काही निर्देशकांचा उपयोग करून बचत गटामुळे झालेले महिला सक्षमीकरण अभ्यासण्याचा प्रयत्न केला असता एकूण ५० उत्तर दात्यांपैकी ३३(६६%) उत्तरदात्यांनी हॅलो या संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या कायदेविषयक प्रशिक्षण शिबिरात सहभाग नोंदविला. हॅलोने काढलेल्या महिला अत्याचारविरोधी मोर्चांमध्ये १४ (२८%) उत्तरदात्यांनी सहभाग घेतला. गावातील दारूबंदीच्या लढ्यात केवळ १०(२०%) उत्तरदात्या महिला सहभागी झाल्याचे दिसून आले. सर्व ५०(१००%) महिला उत्तरदात्या मतदानाचा हक्क बजावताना दिसतात.त्यापैकी ४९(९८%) महिला कोणाच्याही प्रलोभनाला,दबावाला बळी न पडता स्वेच्छेने मतदान हक्क बजावताना दिसतात.

7) एकीकडे सर्व ५०( १००%) उत्तरदात्या मतदान करीत असल्या तरी ग्रामसभेत सहभाग घेणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १९(३८%) इतकी आहे. ग्रामसभेतील सहभागामागील प्रेरणेविषयी विचारले असता हॅलो या स्वयंसेवी संस्थेच्या मार्गदर्शनामुळे सहभागी होणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण १८( ९४.७४%) इतके आहे.तर एक उत्तरदाता मैत्रिणीच्या सांगण्यावरून ग्रामसभेत सहभागी झाल्याचे दिसून येते.

8) ज्या १८ उत्तरदात्यांनी हॅलो या संस्थेच्या मार्गदर्शनानुसार ग्रामसभेत सहभाग नोंदविल्याचे सांगितले त्यांच्या ग्रामसभेतील सक्रिय सहभागाचे स्वरूप पाहता १३ (६८.४२%) उत्तरदात्यांनी परिसर स्वच्छताविषयक प्रश्न विचारल्याचे सांगितले आहे. ग्रामसभेत उपस्थित राहूनही प्रश्न न विचारणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ३ असून त्याचे प्रमाण (१५.७९%) इतके आहे. २ (१०.५३%) उत्तरदात्यांनी ग्रामसभेत पाणी आणि विज पुरवठयावरील प्रश्न विचारले तर केवळ १(५.२६%) उत्तरदात्यांनी शालेय पोषण आहारविषयक प्रश्न विचारला.

Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

9) सर्व ५०(१००%) उत्तरदात्या मतदानाचा हक्क बजावताना दिसत असल्या तरी निवडणुकीस उभे राहण्याविषयीची पसंती केवळ ६ (१२%) उत्तरदात्यांनी दिली आहे.

**निष्कर्ष :**

**आर्थिक सक्षमीकरण :**

1. महिलांच्या अनेक प्रश्नांचे मूळ तिच्या आर्थिक परावलंबनात आहे, हे ओळखून ‘हॅलो’ या स्वयंसेवी संस्थेने बचतगटाच्या माध्यमातून महिलांना‘स्वयंसिद्धा’ बनविले.
2. व्यवसायाच्या निमित्ताने महिला घराबाहेर आल्या. बचत गटातून एकत्र येण्याची संधी मिळाली, माहितीची दारे उघडली. नव्या जाणिवा निर्माण होण्यासाठी ,जागृतीसाठी बचत गटाचे संघटन हे एक माध्यम आहे हे ‘हॅलो’ ने आपल्या कार्यातून सिद्ध केले.
3. महिलांच्या आर्थिक क्षेत्रातील सहभागाला बचत गटातील भांडवल उपलब्धीने अवकाश निर्माण करून दिला. आर्थिक क्षेत्रातील वाढत्या सहभागाने महिला सक्षमीकरणाला गती मिळाली.
4. ‘हॅलो’च्या बचत गटामुळे कमी व्याजदराने पैसा उपलब्ध झाला, बचत गटाने सावकारीला कणखर पर्याय दिला.
5. तुटपुंजी बचत करून,बचत गटातून पैसा उपलब्ध करून,व्यवसाय केल्यामुळे कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ झाली, बचतीत भर पडली.संकटकाळी पैसा उपलब्ध झाला. कुटुंब आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाले, मुलांच्या शिक्षणास मदत झाली हे सर्व ‘हॅलो’च्या स्वयंसेवी संस्थेच्या बचत गटातील सहभागाने झाले. परिणामी कुटुंबात महिलांना मिळणाऱ्या वागणुकीत बदल झाला.
6. महिलांना मुलांच्या आरोग्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मिळाले, अधिकारांचा उपयोग करण्याची क्षमता बचत माध्यमातून ‘हॅलो’ या स्वयंसेवी संस्थेने निर्माण केली.
7. महिलांना शेतीविषयक निर्णय प्रक्रियेत स्थान मिळाले थोडक्यात कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग काही प्रमाणात वाढल्याचे आढळून आले.

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**सामाजिक सक्षमीकरण**

1. कायदेविषयक प्रशिक्षणात सहभागी होऊन, उपस्थित राहून महिला अत्याचार विरोधी मोर्चा, दारूबंदी लढ्यात सहभागी झाल्याने संघटन शक्तीचे महत्व समजले. जाणिवा विकसित होऊन संघटीत प्रतिकार ही सक्षमीकरणाची पूर्व अट असते. हे 'हॅलो' च्या कार्यकर्त्यांना दिसून आले.
2. कायदेविषयक प्रशिक्षणामुळे हिंसेच्या विस्तृत संकल्पनेचे आकलन झाले.वारसा हक्क,घटस्फोट कायद्याची,माहिती झाली. कुटुंबातील छळ बचत गटात सांगण्यास धीर आला. कौटुंबिक छळ कमी झाला. कुटुंबातील इतरांबरोबर सामोपचाराचे संबंध निर्माण झाले.
3. लहानपणापासून स्त्री म्हणून दुय्यमत्वाचे संस्कार झालेल्या किशोरींना आपल्यालाही माणूस अधिकार आहेत. स्वत:ची मते आहेत, आवडी निवडी आहेत याची जाणीव होऊन आत्मविश्वास वाढला आहे.

**राजकीय सक्षमीकरण :**

1. हॅलो च्या प्रेरणेने महिलांचा ग्रामसभेतील सहभाग वाढताना दिसतो. सार्वजनिक ठिकाणी उभे राहून महिलांचे प्रश्न मांडण्याचा धीटपणा त्यांच्यामध्ये आला.
2. निवडणूक लढवून सत्तेत सहभागी होण्याविषयीच्याजाणिवा फारश्या विकसित झालेल्या दिसत नाहीत. निवडणूक प्रक्रियेतील महिलांचा नगण्य सहभाग त्यांच्यात राजकीय सत्तेविषयी अनास्था दर्शविताना दिसून येतो.

**संदर्भ ग्रंथ सूची:**


1. ईनामदार एन.आर. (१९८८) रोल ऑफ व्हाल्यूंटरीझम इन अॅड कोटेड इन सोशल वेलफेअर अॅडमिनिसट्रेशन संपा.डी.आर.सचदेव, अलाहाबाद: किताब महल, पृ.क्र २००.
2. कारत प्रकाश(१९८४) दि मार्क्ससिस्ट,पृ.क्र १९-५४.
3. कोतवाल लेले मेधा (२००७),सत्ता व सबलीकरण लिंगभाव आणि पंचायत राज प्रशिक्षण साहित्य संच, पुणे: आलोचना स्त्री विषयक संग्रहण व संशोधन केंद्र.


*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

4. दीनानाथ मनोहर (२०११),प्रस्तावना,विलास रणसुभे संपा, एनजीओ ,श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर, पृ. क्र.१५.
5. धनागरे.द.ना (२००५),स्वयंसेवी संघटना, अंतरंग आणि आव्हाने,संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव, पुणे: प्रतिमा प्रकाशन, पृ. क्र १८१ -१८४.
6. भागवत विद्युत (२००१), सक्षमीकरण संकल्पना व व्यवहार, महिला सबलीकरण विशेषांक, विद्यापीठ वार्ता, पुणे :पुणे, विद्यापीठ.
7. मुतालीब एम .ए. (जुलै.सप्टेंबर १९८७) व्हाल्यूंटरीझम अँड डेवलपमेंट थेओरोटिकल परर्स्पेक्टिव्ह, द इंडियन ऑफ पब्लिक अॅडमिनिसट्रेशन ,खंड ३३.
8. शर्मा,एस.एल (१९९२) हारब्रिंगर ऑफ सायलेंट रिव्होल्युशन,इकॉनोमिक अँड पॉलिटिकल विकली,पृ.क्र २५५७-६१

**वृतपत्र, साप्ताहिके, पाक्षिके,मासिके,त्रैमासिक**

1. आजचा सुधारक मासिक अंक ६ ,७,८ सप्टेंबर ते नोव्हेंबर २००८ .
2. साप्ताहिक सकाळ १७ जुलै १९८३, १९ फेब्रुवारी २०००.

**Cite Your Article as:**

Shivaji Ukrande. (2023). HELLO YA SWYAMSEVA SANSTHECHYA BACHAT MAHILA SAMIKSHIKARANATIL YOGDAN : EK SAMAJSASTRIYA ADHYAYAN. Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies, 12(78), 626–641. https://doi.org/10.5281/zenodo.8333615

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*